# वसई-विरार शहर महानगरपालिका

## पाणी पुरवठा विभाग, मुख्यालय

## प्रेसनोट

दि.२७/०३/२०२५

वसई-विरार शहर महानगरपालिकेस सुर्या टप्पा-१ व ३ या योजनेतुन २०० द.ल.ली. प्रतिदिन पाणी उपलब्ध होत असून दि.१५/११/२०२३ पासून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सुर्या ४०३ द.ल.ली. पाणीपुरवठा योजनेतून १४० द.ल.ली. प्रतिदिन पाणी उपलब्ध होत आहे.

MMRDA च्या पाणी पुरवठा योजनेतील कवडास पंपिंग स्टेशन आणि सूर्या नगर जलशुद्धीकरण केंद्र (कासा विक्रमगड) येथे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी MSEDCL मार्फत विज पुरवठा होत आहे. मंगळवार, दि.२५ मार्च, २०२५ रोजी संध्याकाळी ०६:०० वाजता सदर योजनेला विज पुरवठा करणारा रोहित्र (Transformer) नादुरुस्त झाला असल्याने योजनेचा विजपुरवठा पुर्णपणे खंडित झाला आहे. परिणामी MMRDA मार्फत सुर्या धरणातून होणारा १४० द.ल.ली. पाणी पुरवठा पुर्णपणे बंद झाला आहे.

सदर योजनेचा विज पुरवठा सुरळीत होण्यासाठी अंदाजे पुढील ३ ते ४ दिवसांचा कालावधी लागणार असल्याचे MMRDA मार्फत कळविण्यात आले आहे. तसेच या दरम्यान योजनेतून होणारा पाणी पुरवठा पूर्ण पणे बंदच राहणार आहे. सदर राहित्र दुरूस्ती/ बदलण्याचे काम युध्दपातळीवर सुरू आहे.

महापालिकेच्या सूर्या धरणाच्या नवीन आणि जुन्या योजनेतून होणारा एकूण २०० द.ल.ली. पाणी पुरवठा सुरळीत चालू असला तरी MMRDA च्या योजनेतून होणारा पाणी पुरवठा बंद असल्याने वसई-विरार शहरात होणारा पाणी पुरवठा मंगळवार, दि.२५ मार्च, २०२५ रोजी रात्री पासून MSEDCL मार्फत वीज पुरवठा सुरळीत होईपर्यंत कमी प्रमाणात व कमी दाबाने होणार आहे.

तरी महापालिका क्षेत्रास होणारा पाणी पुरवठा हा अपुऱ्या व कमी दाबाने होणार असून नागरीकांनी उपलब्ध पाणी जपुन वापरावे व महापालिकेस सहकार्य करावे हि विनंती.

(समीर भूमकर)
उप आयुक्त (पा.पु.)
वसई-विरार शहर महानगरपालिका

४५